# निशाण क्र.१०२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी याने दावा मिळकतीमधील झाडांची मोजमापे घेण्याकरिता वादीने केलेल्या खर्चाची भरपाई लिलाव रक्कमेतून मिळणेसाठी व साफसफाईच्या वेळी प्रतिवादी क्र.१ याने अडथळा, हरकत करू नये यासाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीमधील मौल्यवान झाडे तोडली असल्याचे कथन करून त्याच्याविरूध्द् तुर्तातुर्त मनाईचा आदेश होण्यासाठी वादीने अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज मंजूर झालेला आहे. त्यानंतर तोडलेली झाडे ताब्यात घेवून त्यांचा लिलाव करणेबाबत वनपाल अधिका—यांस आदेश होणेबाबत वादीने अर्ज केला होता. सदरचा अर्ज देखील मंजूर झाला आहे. दि.०२/०८/२०१७ रोजी वनपाल दावा मिळकतीत गेले असता वादातीत झाडे झाडी—झुडपामध्ये असून ती साफ केल्याशिवाय मोजमापे घेता येणार नाहीत व पुढील कारवाई करता येणार नाही असा अहवाल वनपाल यांनी न्यायालयात दिला आहे. सदर झाडे असलेल्या ठिकाणी प्रचंड झाडीझुडपे असून ती साफ करून झाडांपर्यंत जाण्यास रस्ता बनविण्याकरीता पस्तीस ते चाळीस हजार रूपये खर्च येणार आहे. सदरचा खर्च वादी करण्यास तयार आहे. परंतु, हा खर्च लिलावाच्या रक्कमेतून वादीला मिळणे गरजेचे आहे. वादीस झाडेझुडपे तोडताना साफसफाई करताना प्रतिवादी क्र.१ याने हरकत, अडथळा करू नये असा आदेश होणे गरजेचे आहे. सबब, या कारणास्तव वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ याने सदर अर्जास नि.क्र.१०६ ला म्हणणे देवून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार नि.क्र.८० च्या अर्जास वादी याने लिलावाकरिता प्रतिवादी क्र. २ ते ११ यांची लेखी संमत्ती घेतली नाही. वादी हा दावा मिळकतीतील एक नाममात्र हिस्सेदार असू शकतो. त्यामुळे या झाडांचा लिलाव करण्याकरिता वादीला एकटयाला अधिकार नाही.

झाडे तोडून त्याचे तुकडे करणेकरिता प्रतिवादी क्र.१ याला सुमारे पन्नास हजार रूपये खर्च आला आहे. दावा मिळकतीमधील गवत व काटेरी झुडपे तोडण्याकरिता पस्तीस ते चाळीस हजार रूपये खर्च येवू शकत नाही. एक मजूर ऑटोग्रास कटरद्वारे एका दिवसात संपूर्ण गवत व काटेरी झुडपे साफ करू शकतो. त्याकरिता त्याला एकंदर एक हजार रूपयांपेक्षा जास्त खर्च येणार नाही. सदर रक्कम लिलावाच्या रक्कमेतून देण्याची गरज नाही. वादी हा केवळ स्वतःच्या फायदयाकरिता लिलावाची मागणी करत आहे. प्रतिवादी क्र.१ हा नोंदणीकृत बक्षिसपत्रानुसार दावा मिळकतीमधील तिसऱ्या हिश्श्याचा हिस्सेदार आहे. वादी याने नि.क्र.८० च्या अर्जामध्ये मे २०१७ ला दिलेल्या अर्जामध्ये आता लवकरच पावसाळा सुरू व्हावयाचा आहे अशा परिस्थितीत तोड झालेली झाडे जाग्यावरच पडून राहिल्यास ती कुजून निरूपयोगी होणार आहेत असे कारण दिले होते. आता सप्टेंबर महिना चालू झाला असून पावसाळा संपला आहे. त्यामुळे नि.क्र.८० च्या अर्जानुसार लिलावाचे कारण संपलेले आहे. त्यामुळे नि.क्र.८० चा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी त्याने विनंती केली आहे.

३. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ व प्रतिवादी क्र.१ चा युक्तिवाद ऐकण्यात आला

४. वनपाल यांनी नि.क्र.९७ व ९८ च्या अहवालानुसार सदर लाकडांचे ठिकाणी झाडीझुडपे आहेत व ती साफ करणे आवश्यक आहेत त्या शिवाय मोजमापे घेता येणार नाहीत असे नमूद केले आहे. नि.क्र.८० वरील आदेशानुसार या लिलावाचा खर्च वादीने करायचा आहे असे आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर खर्च वादीने करायचा आहे. त्यामुळे सदरची रक्कम लिलावाच्या रक्कमेतून वादीला देता येणार नाही असे मला वाटते. सदर साफसफाई व झाडीझुडपे काढण्याकरिता प्रतिवादी क्र.१ याने त्यास हरकत व अडथळा करता येणार नाही. मात्र दावा मिळकतीमध्ये वादी म्हणतो

त्याप्रमाणे कोणताही रस्ता तयार करता येणार नाही, त्यामुळे नवीन वाद निर्माण होवू शकतो. प्रतिवादी क्र.१ याने लिलावा दरम्यान अशी साफसफाई करण्यासाठी कोणताही हरकत व अडथळा करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही असे सांगितले आहे. सबब या कारणास्तव प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. दावा मिळकतीमधील वादातीत लाकडांभोवती झाडीझुडपांची साफसफाई करताना प्रतिवादी क्र.१ याने वादीला हरकत व अडथळा करू नये.

३. साफसफाई करणेबाबतचा खर्च लिलावाच्या रक्कमेतून मिळणेबाबतची दाद नामंजूर करण्यात येते.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक २९/११/२०१७